RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ५७(२)] सोमवार, जुलै २०, २०२६/आषाढ २९, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ८५

प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग यांजकडून

**वाचले :—**

(१) मोटार वाहन कायदा, १९८८ मधील कलम ११५ व ११६.

(२) शासन, गृह विभागाकडील अधिसूचना क्र. एमव्हीए ०५८९/सीआर-१०६१-टीआरए-२, दि.१९/०५/१९९०.

(३) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, सुधागड पाली यांचेकडील दि.०९/०३/२०२६ रोजीचे पत्र.

(४) पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र क्र.वाहतूक शाखा/वाहतूक बंदी अहवाल/२०२६, २६३, दि. ३०/०३/२०२६.

**अधिसूचना**

क्रमांक गृह/एमएजी-१/जड अवजड/ वाहतूक बंदी/पाली /२०२६.—ज्याअर्थी, तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, सुधागड पाली यांनी उपोद्घातातील अ.क्र.२ कडील पत्रानुसार सुधागड तालुक्याचे मुख्य ठिकाण असून येथे मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते, तसेच अष्टविनायक तीर्थक्षेत्रांपैकी एक पवित्र स्थान असलेले श्री बल्लाळेश्वर गणपती मंदिर हे देवस्थान पाली येथे असून दररोज तसेच विशेषतः सण-उत्सव व सप्ताहाच्या दिवशी हजारो भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. पाली नगरपंचायत हद्दीतील मुख्य बाजारपेठ व प्रमुख मार्ग अत्यंत अरुंद स्वरूपाचे असून, सदर मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात अवजड वाहतूक सुरू असल्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असून अपघाताचा गंभीर धोका वाढला आहे. अवजड ओव्हरलोड वाहतुकीमुळे रस्त्यांची हानी, ध्वनी व वायू प्रदूषण वाढत असून अनेक वाहनांवर ग्रीन नेटचा वापर केला जात नसल्याने वाळू/क्रश रस्त्यांवर सांडून सार्वजनिक आरोग्य व सुरक्षिततेस धोका निर्माण होत आहे. भाविक, शाळकरी विद्यार्थी, जेष्ठ नागरिक व सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर बाब गंभीर असल्याने या पार्श्वभूमीवर पाली नगरपंचायतीने सर्वसाधारण सभेत ठराव क्र. १९७ दिनांक २७/०२/२०२६ अन्वये सकाळी ७.०० ते रात्री ८.०० या वेळेत अवजड वाहतूक कायमस्वरूपी बंद करण्याबाबत ठराव मंजूर केला आहे. त्यानुषंगाने पाली नगरपंचायत हद्दीत सकाळी ७.०० ते रात्री ८.०० या वेळेत अवजड वाहनांना प्रवेशबंदीबाबत योग्य ते मनाई आदेश निर्गमित करणेबाबत तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, सुधागड पाली यांनी या कार्यालयाकडे विनंती केली आहे ;

आणि ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक रायगड यांचेकडील यांनी उपोद्घातातील अ.क्र.३ कडील पत्रानुसार अवजड वाहनांना पर्यायी मार्ग उपलब्ध नाही. परंतु, जिल्हा वाहतूक शाखेकडून सदर मार्गाची पहाणी केली असता अवजड वाहनांसाठी कोलाड सुकेळी खिंड मार्गे नागोठणे असा पर्यायी मार्ग आहे. तरी स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांना अवजड वाहतुकीचा त्रास होऊ नये व गंभीर स्वरूपाचा अपघात होऊ नये तसेच स्थानिक नागरिक, रुग्णवाहिका, विद्यार्थी व पर्यटक यांचा प्रवास सुखकर होण्याच्या तसेच अपघाताचे प्रमाणे कमी करण्याच्या दृष्टीने उपाययोजना म्हणून पाली नगरपंचायतीचे सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक १९७, दि.२७/०२/२०२६ अन्वये पाली शहरांत असणाऱ्या मार्गावरील सर्व प्रकारची जड अवजड वाहनांची वाहतूक सकाळी ०७-०० ते रात्रौ ०८-०० या वेळेकरिता (दूध, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला, पाणी इत्यादी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना वगळून) बंदीबाबत अधिसूचना निघणेबाबत विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, सुधागड पाली यांनी केलेल्या विनंतीनुसार स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांना अवजड वाहतुकीचा त्रास होऊ नये व गंभीर स्वरूपाचा अपघात होऊ नये तसेच स्थानिक नागरिक, रुग्णवाहिका, विद्यार्थी व पर्यटक यांचा प्रवास सुखकर होण्याच्या तसेच अपघाताचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने उपाययोजना म्हणून सदर मार्गावरील जड-अवजड वाहतूक बंद करणेबाबत माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी, किशन ना.जावळे, जिल्हादंडाधिकारी, रायगड उपोद्घातातील अ.क्र.१ व २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांना अवजड वाहतुकीचा त्रास होऊ नये व गंभीर स्वरूपाचा अपघात होऊ नये तसेच स्थानिक नागरिक, रुग्णवाहिका, विद्यार्थी व पर्यटक यांचा प्रवास सुखकर होण्याच्या तसेच अपघाताचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने या अधिसूचनेच्या दिनांकापासून पासून ते पुढील आदेश होईपर्यत पाली शहरात असणाऱ्या मार्गावरील सर्व प्रकारची जड-अवजड वाहनांची वाहतूक सकाळी ०७-०० ते रात्रौ ०८-०० या वेळेकरिता बंद करणेबाबत आदेश पारित करीत आहे.

सदरची वाहतूक बंदी अधिसूचना ही दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला, पाणी इत्यादी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड वाहने, रुग्णवाहिका, यांना लागू राहणार नाही.

रायगड,
दिनांक २० जुलै २०२६.

**किशन ना. जावळे,**
जिल्हादंडाधिकारी, रायगड.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.